सांकेतांक क्र 19860108 22

क्र. कॉन. एल. आर. ३४/सी-१ /८६
पुणे, दिनांक :- ८ - १ - १९८६.

२e

प. रि प त्र क .

विषय :- मुंबईचा जमीनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्या बाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ कायदा कलम २०[१] खाली भाग योजना मंजूर करण्याबाबत.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख[महाराष्ट्र राज्य] पुणे यांच्या असे निदर्शनास आले आहे की उपसंचालक भूमि अभिलेख हे त्यांना प्रदान केलेल्या कायदा कलम २०[१] खालील शक्तींचा वापर करून कांही गांवाच्या योजनाचे मसुदे भाग मसुदा[ कांही खाती वगळून मंजूर करतात. पूर्ण गांवाचा योजना मसुदा कायदा कलम १९[१] खाली प्रसिध्द करण्यात येतो. त्यावरील आलेले आक्षेप अगर तक्रारी लक्षांत घेवून व दरवर्षीचे विहीत लक्ष्य साध्य व्हावे म्हणून आक्षेप अगर तक्रारीशी संबंधीत खाती वगळून भाग योजना अंतीम मंजूर करण्यात येते व वगळलेल्या खात्यांचा मसुदा विहित पध्दतीने अंतिम मंजूरी प्रत आणण्याचे दृष्टीने विलंब लागतो. उपसंचालक भूमि अभिलेख ,औरंगाबाद यांचे कार्यक्षेत्रातील मौजे मुदखेड तालुका व जिल्हा नांदेड येथील अशा प्रसिध्द मसुदयापैकी कांही खात्यांची भाग योजना सन १९८० साली मंजूर करण्यात आली. परंतू वगळलेल्या खात्यांची भाग योजना अंतिम मंजूर अदयाप करण्यात आलेली नाही. तरीही मंजूर भागांपुरते अधिकार अभिलेख प्रख्यापन करून गांववहिवाटीस पाठविण्यात आले. त्यामुळे त्यामुळे खातेदाराच्यात असंतोष / गैरसमज निर्माण झाले. या सर्व गुंतागुंतीतून जमीन एकत्रीकरण योजनेच्या एकूण कार्यवाहीबाबत जनमानसात व शासनाकडे गैरसमज निर्माण होतात. हे सर्व टाळण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख[महाराष्ट्र राज्य]पुणे असे आदेश देत आहेत की उपसंचालक भूमि अभिलेख, यांनी अशा त-हेने कायदा कलम २०[१] खाली भाग योजना मंजूर करणेपूर्वी या कार्यालयाची पूर्व संमती घेतल्याशिवाय भाग योजना मंजूर करू नये ...

S-246

... मंजूर ... वगळलेल्या खात्यांची योजना भाग योजना मंजूरीपासून तीन महिन्यांत अंतिम मंजूर करावयाची कार्यवाही करण्यात ... या अटीचा भंग केल्याचे आढळून आल्यास त्याबाबत शिस्तभंग कारवाई करण्यात येईल. ...

२. उपसंचालक भूमि अभिलेख, यांनी त्यांच्या अधिनस्त विभागात यापूर्वी अशा भाग योजना मंजूर केल्या असतील व वगळलेल्या खात्यांचा योजना अद्याप पूर्ण होऊन अंतिम मंजूर केल्या नसतील तर त्याबाबतची माहिती त्यांच्या विभागा पुरती संकलीन करून या कार्यालयास या सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात सादर करावी. दिनांक ३१-१२-८५ अखेरची अशी माहिती या कार्यालयास दिनांक ३१-१-८६ पर्यंत बिनचुक सादर करावी. तसेच यांपुढे या पुढील माहिती दर तिमाही संपल्यानंतर पुढील महाचे १० तारखेपर्यंत [ म्हणजे १० एप्रिल, १०जुलै, १० ऑक्टोबर व १० जानेवारी] सादर करावी.

३. एकत्रीकरणासाठी घ्यावयाच्या एखादया गांवात वार्षीक लक्ष्याचा विहित हिश्यापेक्षा जास्त हिस्से असतील आणि सदर गावचे गटबांधणी काम पूर्ण करून योजना त्याच वर्षी कार्यान्वित करणे शक्य नसेल अशावेळी सदर गांवातील वाडया विचारात घेऊन वाडयाप्रमाणे भाग योजना करण्यास हरकत नाही. तथापी अशा त-हेने भाग योजना करणेपूर्वी त्याबाबत आवश्यक तो तपशीलवार प्रस्ताव सादर करुन त्यांस या कार्यालयाची पूर्व परवानगी घेणेत यावी अशा गावाची संपूर्ण योजना [ सर्व भाग योजना] पूर्व परवानगी घेऊन सलग दोन वर्षात पूर्ण करणेची आहे.

सही/- सु. रामकृष्ण.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख[महाराष्ट्र राज्य]पुणे.

प्रतिलिपी/- उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व] यांच्याकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रतिलिपी/- एकत्रीकरण अधिकारी[सर्व] यांच्याकडे माहिती व त्वरीत कार्यवाहीसाठी रवाना.

---/२/-

२/- परिच्छेद २ बाबतची त्यांच्या विभागांची माहिती या कार्यालयाकडे तसेच संबंधित उपसंचालक भूमि अभिलेख यांच्याकडे त्वरीत/ विहित दिनांकास सादर करावी.

प्रतिलिपी/- सहाय्यक जमाबंदीआयुक्त [सर्वसधारण] [भूमापन] यांच्याकडे माहितीसाठी अग्रेषित.

प्रतिलिपी/- कार्यासन अधिकारी ,क -२ ते ७/ अभिलेखापाल ,जमाबंदी आयुक्त पुणे कार्यालय यांच्याकडे माहिती व पुढील कार्यवाहीसांठी अग्रेषित.

२/- कार्यासन अधिकारी २ ते ७ यांनी त्यांच्या संबंधित एकत्रीकरण अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेवून आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेची आहे.

" निर्गमित "

सहाय्यक जमाबंदी आयुक्त[एकत्रीकरण]
पुणे.

नालबंद/८१८६.